# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // इतिवृत्तांत //

**श्रीम. कल्पिता पिंपळे** मा. उपायुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली **दि. १६/०९/२०२५ रोजी दुपारी ३.०० वा.** मा. स्थायी समिती सभागृह, येथे **श्रमजीवी कामगार संघटना तसेच भारतीय कामगार सेना तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या संघटनेची कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसदर्भात एकत्रित बैठक** आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मनपा अधिकारी/कर्मचारी/संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी / पदाधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पिता पिंपळे | उपायुक्त, मुख्यालय |
| २. | श्री. सुनिल यादव | सहा. आयुक्त ,आस्थापना |
| ३. | श्री. योगेश गुणिजन | सहा. आयुक्त |
| ४. | श्री. शदर जिरंगे | लिपीक, आस्थापना |

| अ.क्र. | संघटनेचे पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. उल्हास अंग्रे | अध्यक्ष, श्र.का.सं., |
| २. | श्रीम. विनया मिरांडा | उपसचिव, श्र.का.सं. |
| ३. | श्री. किरण पाटील | खजिनदार, भा.का.से |
| ४. | श्री. महादेव बंदिछोडे | उपाध्यक्ष, भा.का.से |
| ५. | श्री.अभिनंद चव्हाण | अध्यक्ष, मनसे |

**मा. उपायुक्त यांनी बैठकीत दिलेल्या सुचना/निर्णय खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | बैठकीतील विषय | बैठकीत दिलेले निर्णय | अंमलबजावणी करणारे अधिकार/कर्मचारी |
|---|---|---|---|
| १. | अग्निशमन विभागातील श्री. जगदीश पाटील यांचा ५ लाखाचा वैद्यकिय विमा असून त्यांना ३ लाख मंजुर झाले आहेत त्यापैकी २ लाख मिळाले १ लाख बाकी आहेत ते मिळाले नाहीत. | उर्वरित वैद्यकिय विम्याची प्रतिपुर्ती रक्कम येत्या ७ दिवसात त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. | **श्री.शरद जिरंगे (लिपीक, आस्थापना)** |
| २. | सर्व अधिकारी/कर्मचारी यांना १०,२०,३० वर्षाचा लाभ मिळालेला नाही. १०४ सफाई कामगारांना लाभ देणे बाकी होते त्याच्यात काही सफाई कामगार सेवानिवृत्त होणार आहेत त्यांना वेतनात लाभ देण्यात यावा. | २६७ सफाई कामगारांना १०,२०,३० लाभ पगारात लागू केलेला आहे. तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना १०,२०,३० लाभ लागू करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. | **श्री.शरद जिरंगे (लिपीक, आस्थापना)** |

| अ.क्र. | बैठकीतील विषय | बैठकीत दिलेले निर्णय | अंमलबजावणी करणारे अधिकार/कर्मचारी |
| --- | --- | --- | --- |
| ३. | वैद्यकिय विमा पात्र रुग्णालयांची सुधारीत यादी देण्यात आलेली नाही. | रुग्णालयांची सुधारीत यादी कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच वैद्यकिय विमा कंपनीच्या प्रतिनिधीला पुढच्या बैठकीत हजर राहण्या बाबतच्या सुचना देण्यात याव्या. | **श्री.शरद जिरंगे (लिपीक, आस्थापना)** |
| ४. | आता ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत त्यात काही कर्मचाऱ्यांना बदली होऊन ४ महिनेच झालेले आहेत. | ज्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीला एक वर्ष बाकी असेल अशा कर्मचाऱ्याला त्यांच्या सोयी नुसार बदली देण्याबाबत तरतुद आहे. परंतु श्री. विजय डोंगरे त्यांच्या सेवेला ४ वर्ष बाकी आहेत. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |
| ४. | गणपती विसर्जना वेळी कर्मचाऱ्यांची गैरहजेरी लावण्यात आलेली आहे. त्यात काही कर्मचाऱ्यांनी सुट्टी मंजुर करुन देखील त्यांचेही नाव आलेली आहेत. तसेच पंचिंग करुन देखील नाव आलेली आहेत. | ज्या कर्मचाऱ्यांच्या रजा मंजूर आहेत तसेच ज्यांनी पंचिंग केली होती अशा कर्मचाऱ्यांची गैरहजेरीमधील नाव वगळण्यात यावी. | **श्री.शरद जिरंगे (लिपीक, आस्थापना)** |
| ५. | रजेचे जे ॲप आहे त्यात अद्याप सुधारणा झालेली नाही. आस्थापनेकडून बदली आदेश गेले तरी ते आदेश मागतात, तिकडे जावून ते अर्ज मंजुर करुन घ्यावे लागते. | विभाग प्रमुखाने तपासून कार्यवाही करावी. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |
| ६. | रजा ॲप्लीकेशन करताना वर्ग-४ कर्मचाऱ्यांना मदत होत नाही अशी वर्ग-४ कर्मचाऱ्यांची तक्रार आहे. | वर्ग-४ कर्मचाऱ्यांना वर्ग-३ कर्मचारी यांनी सहाय्यता करणे बाबत विभाग प्रमुखाने परिपत्रक काढावे. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |
| ७. | १) आपला सुधारीत आकृतीबंध गेलेला आहे त्यात मागील बैठकीत असे ठरले होते की युनियन सोबत बसून सुधारीत आकृतीबंध पाठवू.<br>२) सुधारीत सेवा शर्ती नियम पाठवायचे आपण सांगितले होते त्यात सर्व अधिकारी/कर्मचारी यांना फायदा होईल. | १) सुधारीत आकृतीबंध शासनाला अगोदरच गेलेला असल्या कारणाने त्यात आता बदल होऊ शकत नाही. त्यावर शासनाने आपल्याकडून अभिप्राय मागितला होता त्याची पुर्तता करणे आवश्यक होती ती आपण केलेली आहे.<br>२) नव्याने आकृतीबंध पाठवायचा झाला तर त्यात संघटनेला विचारात घेतले जाईल. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |

| अ.क्र. | बैठकीतील विषय | बैठकीत दिलेले निर्णय | अंमलबजावणी करणारे अधिकार/कर्मचारी |
|---|---|---|---|
| | | ३) सध्यस्थितीत पद भरती चालू असल्यामुळे आपण सुधारीत सेवा शर्ती नियम पाठवू शकत नाही. पद भरती नंतर आवश्यकता वाटल्यास सुधारीत सेवा प्रवेश नियम शासनास पाठविण्यात येईल. | |
| ८. | अधिकारी/ कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाचा ५ वा हप्ता देणे बाबतचा प्रस्ताव अद्याप आस्थापना विभागाने सादर केलेला नाही. | आस्थापना विभागाकडून प्रस्ताव सादर केलेला असून मुख्य लेखा विभागाकडे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. | **श्री.शिरीषकुमार धनवे ( मुख्य लेखाधिकारी )** |
| ९. | २१३ सफाई कामगारांना घरे देणे बाबत. | सध्यस्थितीत १८ सदनीका उपलब्ध आहेत, सफाई कामगारांना टप्या टप्याने सदनीका उपलब्ध करुन दिल्या जातील. | **श्री.नितीन मुकणे (मालमत्ता व्यवस्थापन)** |
| १०. | वारसांना कामावर घेण्यासाठी शुक्रवारी बोलविण्यात आले होते परंतु त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले नाहीत. | मा. आयुक्तांशी चर्चा करुन १७ सप्टेंबर नंतर तारीख निश्चित केली जाईल. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |
| ११. | श्रीम. क्रिटा रिटा तसेच पात्र कर्मचाऱ्यांना प्रवास इंधन भत्ता देण्यात आलेला नाही. | सदर झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाकडून यादी उपलब्ध करुन घेण्यात यावी. | **श्री.शरद नानेगांवकर (कार्यकारी अभियंता, पा.पु.)** |
| १२. | कर्मचाऱ्यांना सार्वजनिक सुट्टीचा जादा कामाचा मोबदला मिळणे बाबत. | ज्या कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कामावर हजर होते त्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांकडून यादी प्रमाणित करुन उपलब्ध करुन घेण्यात यावी. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |
| १३. | ज्या कामगारांनी वैद्यकिय विमा सुरु होण्याच्या अगोदर रुग्नालयात उप्चार करुन घेतला आहे त्याची प्रतिपुर्ती रक्कम मिळण्यासाठी स्थायी कर्मचाऱ्याने कोणाकडे प्रस्ताव सादर करवा ? | सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव सादर करावा. | **श्री.सुनिल यादव (सहा.आयुक्त,आस्थापना)** |

| अ.क्र. | बैठकीतील विषय | बैठकीत दिलेले निर्णय | अंमलबजावणी करणारे अधिकार/कर्मचारी |
|---|---|---|---|
| १४. | कामगारांना ग्रॅज्युईटी देणे बाबत मागच्या बैठकीत निर्णय झाला कि १५ दिवसात ग्रॅज्युईटी देण्याताबत ठेकेदाराला सुचना देण्यात येतील त्य.ला एक महिना झाला त्यावर अद्याप अंमलबजावणी झाली नाही. | पुढील ७ दिवसात प्रथम टप्यात मयत कामगारांना ग्रॅज्युईटी देण्यात येईल तदनंतर इतर पात्र कामगारांना ग्रॅज्युईटी रक्कम अदा केली जाईल. तसेच ग्रॅज्युईटी पात्र कामगारांची यादी संघटनेला उपलब्ध करुन दिली जाईल. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| १५. | दि. १६/०७/२०२३ पासुन ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट कंपनीच्या ठेकेदाराने कामगारांना नियुक्ती पत्र दिलेले नाहीत. | नियुक्ती आदेश ह्या महिन्याच्या आत कामगारांना देण्यात येतील. तसेच नियुक्ती आदेश देताना कोणत्या तारखेचे देण्यात येतील त्याबाबत ठेकेदाराकडून माहिती घेऊन आपल्या संघटनेला कळविण्यात येईल. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| १६. | ठेकेदाराने कामगारांना २ लाखाचा वैद्यकिय विमा दिलेला आहे. २ लाखाचा विमा पुरेसा नसुन कमित कती १० लाखाचा विमा कामगारांना मिळावा. | नियमानुसार कामगारांना २ लाखाचा वैद्यकिय विमा दिलेला आहे. संघटनेच्या मागणी नुसार ठेकेदाराशी चर्चा करुन आपल्या संघटनेला उत्तर कळविण्यात येईल. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| १७. | ठेका कर्मचाऱ्याचा अपघात झाल्यास काही दिवस किंवा एक महिना तो घरी बसल्यास त्या दिवसाचा पगार त्याला ठेकेदामार्फत भरुन मिळावा. | तपासून नियमोचित कार्यवाही केली जाईल. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| १८. | पिंपरी महानगरपालिकेत समान काम समान वेतन लागु झाले आहे. पुर्ण महानगरपालिकेत लागू करणे बाबत आदेश दिलेले आहेत. | नियमानुसार कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन आपल्याकडून देण्यात येत आहे. समान काम समान वेतन स्थायी कर्मचाऱ्यांना लागू आहे. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| १९. | कंत्राटी कामगाराने १५ ते २० वर्ष काम करुन त्याचा काही कारनास्तव मृत्यु झाल्यास त्याच्या कुटूंबातील एकाला वारसाने कामावर घेणे बाबत. | लाड पांगे समितीच्या शिफारशी नुसार स्थायी सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना कामावर घेणे बाबत तरतुद आहे. कंत्राटी कामगारांना ते नियम लागू नाहीत. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| २०. | वैद्यकिय विमा ओळखपत्र डाऊनलोड करते वेळी काही कामगारांचे चुकोचे नंबर टाकले आहेत त्यामुळे कामगार ते | वैद्यकिय विमा ओळखपत्र डाऊनलोड करुन घेण्यासाठी शिबीर आयोजित करण्यात यावे. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |

| अ.क्र. | बैठकीतील विषय | बैठकीत दिलेले निर्णय | अंमलबजावणी करणारे अधिकार/कर्मचारी |
|---|---|---|---|
| | डाऊनलोड करु शकत नाही. कामगारांना स्मार्ट कार्ड उपलब्ध करुन द्यावेत. | | |
| २१. | ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट कंपनीचा कामगार सेवानिवृत्त झाल्यास त्याची फाईल ते जमा करुन घेत नाही आम्ही सांगु तेव्हा जमा करा असे त्यांच्याकडून उत्तर मिळते. | त्याबाबत ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट कंपनीबरोबर संबंधित विभाग प्रमुखांनी विचारणा करावी. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| २२. | कंत्राटी कामगारांना वेतनवाढ मिळणे बाबत. | कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन मिळत आहे. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |
| २३. | बैठकीत आपले सर्व विभाग प्रमुख उपस्थित असतात त्याच प्रमाणे ठेकेदाराला सुध्दा आपण बैठकीत बोलवावे. | संबंधित ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना पुढच्या बैठकीत हजर राहणे बाबत तशा सुचना देण्यात याव्यात. | **श्री.योगेश गुणीजन (सहा. आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग)** |

**वरील विषयांबाबत निहित कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी असे बोलून उपस्थितांचे आभार माणून बैठक समाप्त करण्यात आली.**

(कल्पिता पिंपळे)
**उपायुक्त, मुख्यालय**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/२०९३ /2025-26 दि. 14 / 10 /2025

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय:- दरमहा बैठकीबाबत

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचा-यांच्या मागण्यांसदर्भात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत प्रत्येक महिन्याच्या दुस-या मंगळवारी दुपारी 03.00 वाजता प्रलंबित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी संदर्भिय परिपत्रकान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी म्हणजे दि.14/10/2025 रोजी संघटनेसोबत बैठक करण्यात येते. परंतू कार्यालयीन कामकाज कारणास्तव दि.14/10/2025 रोजीची बैठक रद्द झाल्याने सदरची बैठक मा.उपायुक्त (मुख्यालय) यांचे अध्यक्षतेखाली दि.16/10/2025 रोजी दुपारी 12.00 वाजता आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर बैठकीस आपण मागील दि.12/08/2025 व 16/09/2025 रोजी आपल्या विभागाला दिलेल्या इतिवृत्तांतनुसार केलेली कार्यवाहीबाबत सर्व कागदपत्र व माहितीसह वेळेवर उपसिथत राहावे, ही विनंती.

(सुनिल यादव)
सहा. आयुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
मा.उप-आयुक्त (सर्व),
मिरा भाईंदर महानगरपालिका